नोव्हेंबर २००३

# ''पतसंस्था परिवारला ३ वर्षे पुर्ण

१३ नोव्हेंबर २००० साली ''पतसंस्था परिवार'' हे सहकार क्षेत्रातील पहिले मासिक नोंदणी क्रमांक MAHMAR/2000/3211 द्वारे प्रसिध्द करण्यात आले. आज १३ नोव्हेंबर २००३ रोजी ''पतसंस्था परिवार'' या मासिकाला ३ वर्षे पुर्ण झालेली आहे.

आजचा हा ३६ वा नियमीत अंक आपल्या सेवेस सादर करीत आहोत. राज्यातील सहकार चळवळ व ज्यात प्रामुख्याने पतसंस्थांचा सहभाग आहे, त्याच क्षेत्रात हे मासिक सातत्त्याने यशस्वीरित्या आपल्या लेखणीतून व विचारातून काम करीत आहे. प्रामुख्याने सभासद व असंख्य वाचकांनी नियमीतपणे या मासिकाची नोंद घेऊन आम्हाला प्रोत्साहन दिलेले आहे. एवढेच नव्हे तर स्वत:हून ''पतसंस्था परिवारमध्ये'' जाहिराती प्रसिध्द करण्याची विनंती पत्रे पाहून आमचाही जोश वाढलेला आहे. आणि ही वैचारिक क्रांती या मासिकामार्फत पतसंस्था चळवळीत सदैव मार्गदर्शक ठरेल, असे वातावरण दिवसेंदिवस तयार होत आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री सहकार महर्षी, पद्मभूषण व सर्वसामान्यांचे नेते कै. वसंतदादा पाटील यांच्या स्मरणाने ''पतसंस्था परिवार'' उभे राहिलेले आहे व तोच आदर्श वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा सदैव प्रयत्न राहणार आहे. लढायचे असेल तर कोणीतरी लढ म्हटले पाहिजे, यासाठी हा अट्टाहास आहे. पतसंस्था त्यातील एक चळवळ आहे. संस्था चालकांनी व कार्यकर्त्यांनी स्वत: वाचन करावे, उपविधी स्वत: वाचावा व सहकार कायद्याचे पुस्तक स्वत: हाताळावे हा आमचा आग्रह कायम आहे. आणि या आग्रहापोटी ''पतसंस्था परिवार'' मासिकाच्या विचाराने पतसंस्थांची क्रांतीकारक पाऊले राज्यात उचलण्यास स्वत:हून कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतलेला आहे, तो खालिलप्रमाणे :

१. पतसंस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा १४ ऑगस्टपुर्वीच घेण्याचा निश्चय पक्का केलेला आहे.

२. पतसंस्थांच्या नवीन शाखा काढण्याअगोदर पतसंस्थेची आर्थिक सक्षमता स्वत:च तपासून शाखा विस्ताराचा मोह टाळला जात आहे, केवळ नवीन शाखेसाठी परवानगी मिळते म्हणून शाखा उघडण्याचे तंत्र बंद करण्यात आलेले आहेत.

३. पतसंस्थेचे कार्यक्षेत्र वाढवून घेण्यासाठी शासनाने प्रसिध्द केलेल्या नियमावलीच्या बाहेर जाऊन परवानगी मिळविण्याचा मोह टाळायला व मध्यस्थांना कायम दूर ठेवायला कार्यकर्त्यांना सुरूवात केलेली आहे.

४. उपलब्ध इमारत निधी एवढीच रक्कम पतसंस्थेच्या कार्यालयासाठी गुंतवणूक करण्याचे धोरण अवलंबण्याचे सुत्र कार्यकर्त्यांनी अंगीकरणास सुरूवात केलेली आहे. केवळ कोणीतरी मध्यस्थी पुरेसा इमारत निधी नसताना देखील परवानगी मिळवून देण्याचे अर्थपुर्ण तंत्र हे आपल्या पतसंस्थेला घातक आहे, हे कार्यकर्त्यांनी आता समजून घेण्यास सुरूवात केलेली आहे.

५. प्राथमिक सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँक ही त्रिस्तरीय महाराष्ट्र राज्यातील सर्वसामान्य, यशस्वी, सुरक्षित व सरकारमान्य सहकारातील साखळी ज्यांनी तोडण्याचे काम चालू केलेले आहे, त्यांना दुर्लक्षित करून हे कारस्थान हाणून पाडण्याचे कार्य कार्यकर्त्यांनी मोठ्या उमेदीने चालू केलेले आहे.

६. पतसंस्थांमधील राखीव निधीची गुंतवणूक व अतिरिक्त निधींची गुंतवणूक ही आपापल्या जिल्हा मध्यवर्ती बँकेतच करावयाची हे धोरणच शासकीय धोरण आहे, याची जाण सर्व कार्यकर्त्यांना झालेली आहे.

७. पतसंस्थांचा पैसा हा कायद्याच्या चौकटीत बसवून असुरक्षित ठिकाणी गुंतवायचा हे सहकारातील कार्यकर्ते कदापि मान्य करू शकत नाही, असे चित्र आता राज्यभर तयार झालेले आहे.

पतसंस्थांची चळवळ पोखरून काढून, खिळखिळी करून, कार्यकर्त्यांना मोहजाळात सापडविण्याचे षडयंत्र राज्यात चालू झालेले आहे, ते पुर्णपणे मोडून काढायचे, अशी मानसिकता कार्यकर्त्यांमध्ये झाल्यामुळे, सर्वत्र आशादायक वातावरण तयार झालेले आहे, कलम ७८, ८३, ८८ चा वापर व गैरवापर व मध्यस्थांमार्फत समेट ह्या सर्व प्रकाराला कार्यकर्त्यांनी विरोध चालू केल्याचे चित्र बघितल्यानंतर ''पतसंस्था परिवार'' ला केलेल्या कामाची पोच मिळाल्याचा या निमित्ताने आनंदही ३ वर्षे पुर्ण झाल्यानंतर होत आहे. म्हणून चेतना तयार करणारे प्रेम आम्ही कदापि वाया जाऊ देणार नाही.

''पतसंस्था परिवार'' चौथ्या वर्षात पदार्पण करीत आहे. खुली अर्थव्यवस्था व्याजदरात होत असलेली घसरण व चळवळ मोडून काढणारी अदृष्य शक्ती व महाराष्ट्र शासनाला व त्यांच्या अधिकाराला आव्हान करणारे महाभाग यांचा समाचार घेत, धैर्याने वाटचाल चालू राहणार आहे. महाराष्ट्र अँड गोवा राज्याच्या अपेक्स बँकेचे लायसन्स अखेर सुप्रिम कोर्टाने रद्द केलेच. आणि त्याचे कारणही हेच आहे. अधिकाराचा गैरवापर करून ज्या वेळेला कृती होते, त्यावेळेस चळवळीमध्ये अनेक वर्षे सर्वांना त्रास होत असतो. न्याय मिळायला वेळ लागतो. परंतु न्याय हा मिळतोच. अपेक्स बँकेतील ८०० कोटी रूपये हे राज्यातील नागरी सहकारी बँकांचे, अर्थात सर्वसामान्यांचे – ठेवीदारांचे आहेत. त्यांना हे पैसे कोण देणार ? हा यक्ष प्रश्न आता ऊभा राहिलेला आहे. अपेक्स बँकेतील हे पैसे नागरी बँकांना नजीकच्या काळात मिळाले नाहीत तर, ह्या नागरी सहकारी बँका अडचणीत आल्याशिवाय राहणार नाहीत. ज्या रिझर्व्ह बँकेने अपेक्स बँकेला लायसन्स दिले व त्याला महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने अत्यंत योग्य पध्दतीने व चळवळीच्या हितासाठी व प्रामुख्याने ठेवीदारांच्या हितासाठी विरोध केला होता. त्यावेळी कोणी ऐकले नाही, समजून घेतले नाही. शेवटी सुप्रिम कोर्टाला आदेश द्यावे लागले. परंतु एवढ्या मोठ्या कालावधीत ८०० कोटी रूपये रिझर्व्ह बँक ह्या नागरी सहकारी बँकांना कसे परत करणार ? हाच खरा प्रश्न ऊभा राहिलेला आहे. पतसंस्थांमध्ये

देखील अशाप्रकारचे विचार लादण्याचे प्रयत्न शासनाने वेळीच हाणून पाडले पाहिजे. ही काळाची गरज आहे. पतसंस्थांमधील पैसा असुरक्षित ठिकाणी कायद्याच्या चौकटीत बसवून इतरत्र गुंतविण्याची किमया रोखण्याची गरज आहे. वेळ गेल्यानंतर ह्याचा काहीही उपयोग होणार नाही. सर्व संबंधित हात वर करून मोकळे होतील. जसे अपेक्स बँकेचे झालेले आहे.

चौथ्या वर्षात ''पतसंस्था परिवार'' पदार्पण करीत असताना सर्व सभासद, वाचकांचे प्रेम, ऊत्स्फूर्तपणे प्रतिक्रियांनी वाढत रहावे. हीच माफक अपेक्षा आम्ही आमचे काम आपल्या जवळकीच्या आधारामुळे करीतच राहणार व सर्वसामान्य जनतेच्या-सभासदांच्या-ठेवीदारांच्या उध्दारासाठी उभी केलेली पतसंस्थांची चळवळ, सर्वसामान्यांसाठीच फायदेशीर ठरावी. व सर्वसामान्य माणूस सर्वार्थाने स्थिर व्हावा व तसेच प्रयत्न ''पतसंस्था परिवार'' भविष्य काळातही करील, हीच सहकार महर्षी कै. वसंतदादा पाटील यांना श्रध्दांजली.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**